।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष ९ वे ❖ अंक ५ वा ❖ माघ -फाल्गुन शके १९३४ ❖ ११ फेब्रुवारी २०१३ ते १० एप्रिल २०१३

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


◆ भक्तगाथा ०३

◆ गोजिरवाणी ०५
- सौ. नीता कुलकर्णी

◆ अहो ऐकलतं का ? ०६
- सौ. सुवर्णा

◆ शब्द तेचि छेडिता ०९
- सौ. मेघा

◆ गुंजारव १०
- सौ. शुभांगी मोकाशी

◆ तरुणाई ११
- आत्मजा

◆ रुचि रुचि भोजन १२

◆ भागिरथीच्या काठावर... १३

◆ उत्सव विशेष १५

## संपादकीय... ✍

'नवे नवे' म्हणताना 'पाझर'ची नऊ वर्षे पूर्ण होत आली. खरं तर महाराज आपल्याला जुने होऊच देत नाहीत. दरवेळी नवीन अनुभव, प्रत्यंतर देतात याचा अनुभव 'तरूणाई' वाचताना येईल.

अशीच 'परेची साद' भक्तगाथेतही अनुभवास येईल. महाराजांवर पूर्ण भार टाकल्यावर ते कसे सांभाळतात याचेच वर्णन या अंकात आले आहे. असा प्रसाद खाण्यास मात्र आपण घडायला हवे! हेच 'गोजिरवाणी' त सांगितले आहे.

ही घडण होताना वाटेत येणारी प्रलोभने साधकास ज्ञानापासून कशी परावृत्त करतात याचे सुरेख वर्णन 'अहो ऐकलतं का' मध्ये आले आहे. प्रत्येक साधकाने यापासून स्वतःस लांब ठेवले पाहिजे. खरं तर महाराज आपल्याला हळूहळू हे सारे शिकवितच असतात, आपल्या नकळत! 'शब्द तेचि छेडिता' वाचताना हेच जाणवते.

स्नान, संध्या, जप, प्राणायाम या साऱ्यांचे महत्त्व सगळे जाणतात. पण ही कर्मे जाणून कशी करायची याचे वर्णन 'भागिरथीच्या काठावर...' मध्ये आले आहे.

अशीच कर्मे जर आपण जाणून करत गेलो तर महाराजांची 'परेची साद' आपल्याला नक्कीच ऐकू येईल.

---

**पान नं. १५ वरून**

*सद्‌गुरु शिर स्फुर्ति टाकूनी पाहता भक्ते वात्सल्ये।*
*आसक्तीचे बिरडे गेले। कैवल्य हाता आले।।५।।*
*सद्‌गुरु ह्रदय निजप्रेम सागरी कैवल्य लाजले।*
*जग हे चिद्‌विलासी नटले मूढा द्वैत गमले।।६।।*
*सद्‌गुरु हस्त मूढा ही तारीत बंध तोडी भले।*
*माधुरीदत्त परंपरेत गुरुशिष्य ऐसे खेळले।।७।।*

गुरू हेच ब्रह्मदेव, विष्णू व शंकर आहेत. आत्मबोधाने शिष्य गुरुपुत्र होतो. गुरुमुख श्रवणाने त्याचे पालन होते. आत्मज्ञानाने जीवाचा अज्ञाननाश होतो.

**- श्रीसस भागीरथीनाथ**

# भक्तगाथा... ✍

साडेगावी आल्यावर नित्यक्रमाप्रमाणे बोवांनी ईश्वर-भजन, नामस्मरण वगैरे सुरू केले व त्यात ते स्वतः रंगून जात असत. कधी कधी ते एकांतवासाकरिता गावाबाहेर निर्जन स्थळीही जात असत व तेथे प्रेमाने परमात्मभजनात निमग्न होत असत. पांडुरंगाच्या भजनात ते इतके गुंग होऊन जात की, भोजनाचीही स्मृति त्यास राहात नसे. भोजनाच्या वेळेस बोवा घरी परत आले नाही म्हणजे त्यांचे शोधार्थ त्यांचा मुलगा दत्तात्रय यास बोवांची पत्नी पाठवीत असे. एके दिवशी सकाळी स्नानसंध्यादिक कर्मे उरकून बोवा गावाबाहेर एक लिबांचे झाड आहे त्याच्या खाली उभे राहून डोळे मिटून भजनानंदांत मग्न झाले होते. मुखाने 'आनंदिमाय आनंदिमाय। तुजविण गमे न करूं मी काय?' याप्रमाणे त्यांचा नामघोष प्रेमाने चालू होता. बोवा आपल्या नामस्मरणात इतके गुंग होऊन गेले होते की, किती वेळ झाला याचे त्यांस स्मरण राहिले नाही. दिवसाचे सुमारे बारा वाजून गेले, भोजनाची वेळ होऊन गेली, तरी अजून बोवा घरी आले नाहीत हे पाहून सौ. कृष्णाबाईंनीं बोवास शोधून आणण्याकरीता आपला मुलगा दत्तात्रय यास पाठविले. वडिलांचा शोध करीत, दत्तात्रय ज्या झाडाखाली बोवा भजनात मग्न झाले होते तेथे आला व पाहतो तो बोवा डोळे मिटून नामस्मरणांत निमग्न आहेत, डोळ्यांतून प्रेमाश्रुच्या धारा वाहत आहेत व त्यांचे समोर जवळच एक काळाभोर नाग आपला फणा काढून डोलत उभा आहे. हा चमत्कार पाहताच दत्तात्रय घाबरला व त्याने एकदम 'बाबा! अहो बाबा!' अशा मोठ्या हाका मारल्या. दत्तात्रयांचे ओरडणे नागाने ऐकताच तो हळूच चटकन् निघून गेला. नंतर दत्तात्रय त्यांच्याजवळ गेला व त्यांना हालविले. हालविल्यावर बोवा देहभानावर येऊन त्यांनी केव्हा आलास असा प्रश्न त्यास केला. दत्तात्रयाने घडलेला सर्व प्रकार बोवांस निवेदन केला. तो ऐकल्यावर बोवांस अत्यंत आश्चर्य वाटले. नंतर पितापुत्र दोघेही घरी भोजनास गेले. हा प्रकार गावातील बऱ्याच लोकांस कळताच बोवांचे भगवंती असलेले निस्सीम प्रेम पाहून त्यांचे त्यास अत्यंत कौतुक वाटले.

या प्रकारानंतर काही दिवसांनी बोवा करमाळेयेथील त्यांचे सावकार श्री. भगवानदास शेट नागर यांचे भेटीस गेले. त्यांचे बरोबर गावातील १०-१२ शिष्ट मंडळीही होती. बोवास पाहताच सावकारास असे वाटले की, कोणी साधुपुरुष आपले

भेटीस आला आहे. सावकार भगवानदास हा एक सत्पुरुषाचा अनुग्रहीत व अंतःकरणाचा भाविक असल्यामुळे त्याचा ग्रह बोवांविषयी साहजिकच चांगला झाला. त्याने प्रथमतः बोवास ओळखिले नाही. ज्या गृहस्थांची जमीन आपल्याकडे गहाण आहे व ज्यास साडेकर देशमुख म्हणतात ते गृहस्थ हेच असावेत असे शेट भगवानदास यास मुळीच वाटले नाही. कोणी सत्पुरुष आपल्या मंडळींसह आपल्याकडे आला आहे अशी त्यांची कल्पना झाल्यामुळे सावकाराने सर्वांचा आदर सत्कार केला. थोड्याच वेळांत बोवासाहेबांनी आपल्यासंबंधी थोडक्यात माहिती सावकारास निवेदन केली व मोठ्या युक्तिने गहाणा हिशोबासंबंधी बोलणे काढले. जी जमीन बोवांनी सावकाराकडे गहाण टाकली होती त्या जमिनीचे पीक सावकाराने ५-६ वर्षे सर्व घेतले होते. त्या सर्वांचा हिशोब होऊन सावकारामते त्यांचे घेणे फक्त ३०० रू. निघाले. हे देणे बोवांनी कबूल केले. याप्रमाणे हिशेब झाल्यावर सर्व मंडळी आपआपले घरी गेली. साडे गावी पुढे बोवांची बरीच कीर्तने झाली. साडे येथील सर्व मंडळी त्यांच्या प्रेमळ कीर्तनाने खूष होत असत. यामुळे बोवांची कीर्ती त्या सर्व तालुक्यात पसरली. सावकाराच्या कानांवरही बोवा उत्तम कीर्तनकार असून महाभागवत आहेत अशी वार्ता गेली. ती ऐकताच बोवांचे कीर्तन श्रवण करण्याची इच्छा सावकारास झाली. त्याने लागलीच करमाळ्याहून एक गाडी व दोन माणसे पाठविली व बोवांस कीर्तनास बोलाविले. बोवांनी सावकाराकडून आलेले निमंत्रण स्वीकारून जेवण वगैरे उरकून साडे येथील काही मंडळीसह गाडीत बसून ते सावकाराच्या घरी करमाळ्यास गेले. त्या रोजी रात्री सुमारे तीन तास हरिकीर्तन झाले. सर्व श्रोतेमंडळीस व विशेषकरून भगवानदास यास फारच आनंद झाला. सावकाराच्या नेत्रावाटे अश्रुधारा वाहू लागल्या. प्रेमानंदाच्या भरात सावकाराने मध्येच उठून बोवांच्या पायावर लोटांगण घातले. बोवांचे भगवत्प्रेम व निस्सीम गुरुभक्ति पाहून त्यांच्यावरून हा देह ओवाळून टाकावा असे त्यास वाटले व त्याने बोवांस कडकडून मिठी मारिली. बोवांनी त्यास आशीर्वाद देऊन बसावयास सांगितले व त्यांचे कीर्तन फार आनंदात समाप्त झाले. कीर्तन संपल्यावर आपल्या घरीच रात्रीचा मुक्काम बोवांनी करावा असा आग्रह सावकाराने धरल्यामुळे बोवा तेथेच राहिले. सावकाराने बोवांबरोबर पुष्कळ पारमार्थिक प्रश्नोत्तरे केली व सर्व रात्र आनंदात घालवून

**पान नं. १० वर**

# गोजिरवाणी... ✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी** - आज मी तुम्हाला एका दगडाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले** - दगडाची?

**आजी** - होय! अरे, एक मारुतीचे मंदिर होते. तेथे अनेक लोक दर्शनास येत असत. देवळासमोरच एक दगड होता. त्या दगडावर नारळ फोडून लोक मारूतीला प्रसाद ठेवीत असत.

**मुले** - मग त्यात काय विशेष?

**आजी** - एकदा काय झाले काही संतमंडळी या देवळात आली होती. तेव्हा त्यांना हा दगड रडताना दिसला. तेव्हा त्या दगडास याचे कारण विचारल्यावर तो म्हणाला, ''पूर्वी हा समोरचा दगड, ज्याला आता सगळे देव मानतात तो माझ्यासारखाच होता. पण आता मात्र मला नारळ फोडताना घाव सोसावे लागतात व हा खोबरे खातो. असे का?'' मुलांनो, तुम्हाला काही उत्तर सुचते का?

**मुले** - नाही बुवा काही सुचत!

**आजी** - अरे, यावर संतांनी त्यास सांगितले, ''त्या मारुतीच्या दगडाने मूर्ती घडताना घाव सोसले व तो देव बनला. तू मात्र घडला नाहीस व दगडच राहिलास,'' या गोष्टीतून तुम्हाला काय कळले?

**मुले** - घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

**आजी** - बरोबर! आपणही दगडासारखेच असतो. पण गुरुमाऊली आपल्याला घडवित असते, त्या मारूतीच्या दगडाप्रमाणेच! आपण जर आपल्याला घडवून घेतले तर मारुतीच्या मूर्तीप्रमाणेच आपल्याला घाव बसत नाहीत.

**मुले** - आजी, म्हणजे काय?

**आजी** - अरे, तो दगड जसा दुसऱ्यांनाही आनंद देत होता तसेच आपणही आनंदात राहून दुसऱ्यानांही आनंद द्यायला, माऊली आपल्याला शिकवित असते. तसे केल्याने घाव सोसावे न लागता गोड प्रसादच खायला मिळतो.

- सौ. सुवर्णा

## थांबला तो संपला!

(सद्‌गुरूंच्या भोवती शिष्यवर्ग बसलेला आहे.)

**सद्‌गुरु** - बरं का बाळानों, आपल्या मंदिराची जी दुसरी शाखा आहे ना, तेथील पाहणी करावयाची आहे. मी सांगेन तशी काही कामे तेथे करवून घ्यायची आहेत. माझी इच्छा आहे की तुम्ही सर्वांनी मिळून तेथील कार्य पूर्ण करावे!

**सर्व शिष्य** (एका सूरात) :- होय महाराज! आम्ही नक्की करू!

(दुसऱ्या दिवशी सर्वजण परगावी जाण्यास निघतात. सगळेजण म्हणजेच मदन, वत्सला, सरिता, करूणा, राजेंद्र, मनस्वी, विद्या, योगिनी, भैरवी व अच्युत जमलेले असतात. ते भूषणची वाट पहात असतात. इतक्यात भूषण येतो धापा टाकीत!)

**भूषण :** मला माफ करा, मी तुमच्याबरोबर येऊ शकत नाही. कारण माझ्या भावाचे लग्न आहे.

**सगळे :** अरे पण, तू महाराजांना शब्द दिला होतास त्याचे काय?

**भूषण :** काय करणार भावाचे लग्न आहे ना! प्रापंचिकाने प्रपंच न करून कसे चालेल?... मी नंतर येईन हं!

(सर्व जण भूषणविना जाऊ लागतात. इतक्यात एका मुलीचे लग्न मोडल्याने ती व तिची आई रडत असतात. त्यांना ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्यावर त्या आणखीनच चिडतात.)

**मुलीची आई** (चिडून) - नुसत्या कोरड्या गप्पा करु नका. तुमच्यापैकी कोणी करेल का हिच्याशी लग्न?

**मदन** - काळजी करू नका, मी करीन हिच्याशी लग्न!

**सर्वजण** - अरे, तू काय बडबडतो आहेस, तुला समजते का?

**मदन** - काय करणार! अडलेल्याला मदत करायलाच हवी, नाही का? माफ करा, मी पुढील वेळी तुमच्या बरोबर नक्की येईन!

(पुढे गेल्यावर एका रस्त्याच्या कडेला एक बाळ रडत असते. त्याला घ्यायला

कोणीच नसते. वत्सला पुढे होऊन त्या बाळाला जवळ करते.)

**वत्सला** - या बाळाची आई मीच होणार! याला मी अंतर देऊ शकत नाही.

**सर्वजण** - ए, काहीतरीच काय? तुला आमच्या बरोबर यायचे नाही का? महाराजांनी सांगितलेल्या कामाचे काय?

**वत्सला** – नक्कीच यायचे होते. पण आता या बाळाला माझी जास्त गरज आहे.

(वत्सलाला मागे सोडून सर्वजण पुढे होतात. त्यांना थोड्या वेळाने अनेक धरणग्रस्त भेटतात. त्यांच्या अडचणी ऐकून सरिता कार्यप्रवृत्त होते.)

**सरिता** (सर्व धरणग्रस्तांना उद्देशून) - तुम्ही काळजी करू नका. मी तुमचे प्रश्न सोडवीन.

**सर्वजण** - अगं पण...

**सरिता** - नाही, आता मात्र या साऱ्यांना मी असे वाऱ्यावर सोडू शकत नाही. अरे, ह्यांच्यातही भगवंत आहेच ना! मी हे कार्य करूनच मग येईन.

(काही वेळाने प्राणीमात्रांवर दया करणारी एक संस्था दिसते. तेथे सर्व भूतदयेसंबंधी कार्य चालू असते. करूणाचे पाय तिकडे वळतात.)

**सर्वजण** - अगं करूणा, तू कुठे निघालीस?

**करूणा** - ही तर माझी खरी आवड आहे. मला येथे गेलेच पाहिजे. माफ करा, मी काही दिवसांनी परत येईन.

(आणखी काही वेळाने, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन पाहून राजेंद्रला स्फुरण चढते. तो त्या लोकांकडे वळतो.)

**राजेंद्र** (त्या लोकांना संबोधून) - अरे, माझ्यासारखा लढवय्या असताना तुम्ही कशाला घाबरता? मी तुमच्यात सामील होतो.

**सर्वजण** - अरे हे काय करतोस?

**राजेंद्र** - अरे यांचे कल्याण तर मला करायलाच हवे. यावेळी मी नाही येऊ शकत तुमच्यासोबत! नंतर नक्की येईन.

(आणखीन पुढे गेल्यावर अमरनाथ यात्रेला जाणारा एक चमू भेटतो. त्यांच्याशी गप्पा करण्यात व मौजमजा ऐकण्यात मनस्वी रंगून जाते.)

**सर्वजण** - मनस्वी, चल ना! उशीर होतोय!

**मनस्वी** - नाही, मला यांच्याबरोबर जायचे आहे. मला यांच्यासोबत यात्रेचा अनुभव घ्यायचा आहे. देवदर्शन घ्यायचे आहे.

**सर्वजण** - अगं पण, आपल्या कार्याचे काय?

**मनस्वी** - अरे, भगवंत सर्वव्यापी आहे असे महाराजच सांगतात ना! मग मी अमरनाथला गेले तर कुठे बिघडले? मी ती यात्रा करून मग तुमच्यात सामील होईन.

(काही अंतर कापल्यावर एक संशोधन केंद्र दिसते. ते बघून विद्या थबकते.)

**विद्या** - माझ्या ज्ञानाचा खरा उपयोग इथे होईल. कृपा करून मला इथे जाऊ द्या!

**इतर सगळे** - ठीक आहे! तुझी मर्जी! आता तर आम्ही तिघेच उरलो आहोत. आम्हाला जायलाच हवे!

(एके ठिकाणी एक प्राणायाम शिबिर चालू असते. योगिनी तिकडे जाऊ लागते.)

**योगिनी** - माझे आजारपण तर इथे नक्कीच बरे होईल. मी येथील उपक्रम समजावून घेईन व मग तुम्हाला भेटेन.

(भैरवी व अच्युत चालू लागतात. काही वेळाने कानावर संगिताचे सूर पडतात. एका ख्यातनाम गायकाची मैफल चालू असते.)

**भैरवी** - ही मैफल तर मी टाळूच शकत नाही. पंडीतजींचे सूर मला बोलावित आहेत.

**अच्युत** - अगं भैरवी, आपण दोघेच उरलो आहोत. तू तरी चल ना!

**भैरवी** - माफ कर अच्युत! मी आता नाही येऊ शकत. मी नंतर येईन.

(अच्युत एकटाच मंदिरात पोहोचतो व काम करू लागतो. इकडे सद्‌गुरुंच्या कानावर ही गोष्ट पडते.)

**सद्‌गुरु** - मला हे सर्व माहितच होते. खरं तर तेथील कार्य करण्यास एकाच व्यक्तीची गरज होती. परंतु मी सगळ्यांना पाठविले, कारण यातील प्रत्येकजण या कामासाठी स्वतःला पात्र समजत होता. म्हणून कोण कोण गळत जातो व शेवटपर्यंत कोण पोहोचतो हेच मला पहायचे होते. एकटा अच्युतच जिंकला! कुठल्याही मोहात व प्रलोभनात न अडकता! थांबला तो संपला!

# शब्द तेचि छेडिता... ✍

**- सौ. मेघा**

परवा रेडिओवर गाण ऐकलं - 'वेडात मराठे वीर दौडले सात' आणि एकदम वीज चमकली. अरे! आपल्याकडे पण सात शिलेदार आहेत - पंच ज्ञानेंद्रिय आणि मन, बुद्धी.

बोधाच्या वेळेस क्षणिक अनुभव, जीवाने विदेही असल्याचा घेतलेला असतो, पण तो इतका क्षणिक असतो की नंतर ह्या सात मधल्या बुद्धी ह्या शिलेदाराला त्याची खात्री नसते आणि मग मन द्वैतात म्हणजे अनुभव खरचं होता की नव्हता ह्यात अडकते. बोधाच्या वेळेस ज्ञानरूपी तलवार म्यानातून निघालेली नसते, पण तिची पकड थोडी सैल झालेली असते. गुरुदेव आपल्याला सांगत असतात श्रवण घडले पाहिजे. पण हे सात शिलेदार जीवाच्या प्रपंचात पूर्ण गुरफटलेले असतात. श्रवण गुरुबोलाचे करायचे सोडून निरर्थक गोष्टींचे म्हणजे जीवाची स्तुती किंवा निंदा ह्याचेच होत असते. बुद्धीच्या आधी मन कार्यरत असल्याने मनाला सुख-दुःख होत असते आणि मग बुद्धी मनाला बरे वाटेल असेच काम करून घेते. मन हा ऑफिसर कर्मेंद्रियांना कामाला लावतो. फार आनंद झाला असेल तर साजरा करण्यासाठी हॉटेलमध्ये जातो. दुःख झाले असले तरी मनाला बरे वाटावे, वेगळीकडे लक्ष जावे म्हणून हॉटेलमध्ये जातो. डोळे हे जीवाच्या आणि बाहेरच्या रूपातच रमतात. साहजिकच दृष्टीला सुंदर वाटणारे कपडे यात अडकून खरेदी करण्याकडे कल असतो. त्याचेच मनन होत रहाते. नाक एखादा सुवास घेतल्यावर तोच घेण्याकडे ओढ घेते. वाचा गॉसीप करण्यातच गुंतलेली रहाते आणि हेच करणे योग्य आहे असे वाटत रहाते.

पण श्रवणाला आधी बळजबरीने आणि मग आवडीने जाऊन सगळाच फरक पडत जातो.

श्रवणाचे म्हणाल तर आधी गुरूदेव बोलवतात 'अधिक मास आहे कथा करायची आहे, तर एक दिवस येऊन कथा घेऊन जा. सकाळीच ये, तेवढीच पोथी मिळेल.' आपण अगदी पक्के ठरवून जातो, 'चला एक दिवस जाऊन येऊ, मग कथेच्या दिवशीच जाऊ.' पण घडते वेगळेच. निघायच्या आधी गुरुदेव विचारतात, 'काही घरी काम आहे का तुला?' आपण 'नाही' म्हणतो. 'मग ये ना रोज पोथीला.' आपण कसे काय हो म्हणतो हे आपल्याला कळतच नाही आणि बाहेर पडल्यावर विचार येतो, 'बापरे! आता रोज यायचे' असे बळजबरीने येणारे आपण कधी त्यात रमून

जातो तेच समजत नाही. मग खऱ्या अर्थाने हे सात शिलेदार काम करायला लागतात. श्रवण केल्याने (गुरुबोलांचे) ज्ञानरूपी तलवारीचे म्यान कधी गळून पडते आणि ती तेजाने उजळली जाते ते समजतच नाही. हेच सात शिलेदार वेगाने घोडदौड करायला लागतात- ज्ञान मिळविण्यासाठी. रिकामा वेळ गप्पात न जाता मंदीरात जातो. वाचेने भजन म्हणायला सुरुवात होते. कोठलेही गाणे ऐकले की त्यातून ज्ञान घेण्याकडेच कल वाढतो. म्हणजेच श्रवण सतत घडत राहाते. बुद्धी मनावर हावी होते आणि कर्मेंद्रियांना गुरुकार्यासाठी वापरते. दृष्टी आत वळते. विषयांचे (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) सेवन न होता, हेच शिलेदार त्वेषाने त्या विरूद्ध लढतात. म्हणजे खरे तर असे होते की जे सात शेंदाड शिपाई होते ते सात शिलेदार होऊन जातात.

---

## गुंजारव... ✍

**- सौ. शुभांगी मोकाशी**

सद्‌गुरु संत मायबाप। पूर्ण वात्सल्याची मूर्त।
नाही हात बोट लावत। लीलया उचलोनी घेत।
कळा अनंत यांच्यापाशी। वळविती गाई वनात।
गोडी लागे स्वात्मानंदाची। सहज पूर्वकर्म पालटत।
नाही काळ वेळ लागत। असता मस्तकी त्यांचा हस्त।
देहातीत गुणातीत। तेचि सगुण सद्‌गुरुनाथ।
शुभांगी राहते कुशीत। प्रेमप्रिय माधुरीदत्त।

---

**पान नं. ४ वरून**

तो अत्यंत समाधान पावला. दुसरे दिवशी सावकार मनात विचार करू लागला की, बोवांचे उतराई आपण कसे व्हावे? फूल नाही फुलाची पाकळी म्हणून बोवांजवळून घेतलेले गहाणखत काढून त्यावर 'सर्व रकमेची भरपाई झाली' असा शेरा मारून ते गहाणखत त्याने बोवांच्या स्वाधीन केले व बोवांस हात जोडून सांगितले की, 'बोवा आपले सर्व रूपये पावले, आता माझे तुमचे कडून घेणे काही राहिले नाही, उलट मलाच आपण फार ऋणी करून ठेविले आहे. करिता आपण मला पदरात घ्यावे.' हे भाषण ऐकून तेथील सर्व मंडळीस आश्चर्य वाटले व सर्वांनी बोवासाहेब व शेटजी या उभयतांस धन्यवाद दिले.

- आत्मजा

## WORSHIP ???..ITS STRENGTH

Almost a month ago, I had started reading **'Vidnyanasagar.'** I did not understand much at that point, I just plainly kept reading hoping eventually, I will understand what's written. Although I could not make much of what I was reading, I believe it had some other benefits to it, which I had not known.

I had just moved in with my friend who I had known since the first time I came here. We always got along well. Once she had a nasty headache. She tried medicines and other known remedies for it but nothing helped. It had been about 2-3 days since she was in pain. On the third day, it had gotten really worst with the veins from her forehead almost popping out. I had just come out of the shower and found her in the living room sitting on the sofa in terrible pain. (Just to mention here that I normally recite **Abhishek** while I am in the shower as it is not always possible to dedicate separate time to it.) I was concerned to see the veins as I had not known how bad it was before. More out of curiosity than anything else, I just gently touched the throbbing veins. Surprisingly, within 10-15 minutes of having done that, she started feeling better. I was surprised to see how relieved she was immediately. I do not know what happened, but the result was right before my eyes. She kept asking me what I did, but there was nothing I did to cure her pain. I was stunned.

I am sure, it was God trying to give me just a small example of the infinite power, we all possess which we are unaware of. Although we learn about it, we never truly imagine exploring it. It is only when you step out of yourself, open yourself, you can truly begin to understand the magnificence of yourself. I do not think I would ever have attempted any of this.

It was Gurudev, who gave me the strength and a different perspective. It also showed that distance is immaterial for her to reach us. Distance and time are both in our minds.

## उपासनेला दृढ चालवावे (स्वैर अनुवाद)

जवळजवळ एक महिन्यापासून मी **'विज्ञानसागर'** वाचत होते. मला खरं तर त्या वेळेला काहीच समजले नव्हते, पण मी तसेच वाचत होते, याच आशेवर की

कधीतरी मला त्यातले सारे उमगत जाईल. त्यात मला माहित नसलेले अनेक फायदे दडलेले होते याचेच प्रत्यंतर आले.

परदेशात शिकायला गेल्यापासून मला एक चांगली मैत्रीण मिळाली होती. आमचे नेहमीच छान जुळत असे. एकदा तिला डोकेदुखी झाली होती. तिने सगळे औषधोपचार केले. पण कशाचाच गुण येत नव्हता. दोन दिवसांपासून तर ती फारच त्रासलेली होती. तिसऱ्या दिवशी मात्र कहरच झाला. तिच्या कपाळावरची शिर थडाथड उडत होती. मी नुकतीच स्नान करून बाहेर आले तर ती सोफ्यावर वेदनांनी तळमळत बसलेली होती. (वेगळी सवड नसल्याने रोज अंघोळ करतानाच **अभिषेक** म्हणायची सवय मी लावून घेतलेली होती.) मला तिची खूपच काळजी वाटू लागली. काळजीपोटीच मी तिच्या शिरेवर हळूवार स्पर्श केला. आश्चर्य म्हणजे दहा-पंधरा मिनिटात तिला बरे वाटू लागले. काय झाले हे मात्र कळलेच नाही. पण जे घडले ते डोळ्यादेखतच! ती मला सारखे विचारू लागली, ''तू मला कसे बरे केलेस?'' मी खरं तर काहीच केले नव्हते. मी थक्क झाले!

खरं म्हणजे आपल्यात अमर्याद शक्ती आहे हे आपल्याला माहितच नसते. याचीच झलक मला देवाने दिली. आपण ते नीट जाणून घेत नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या देहभावातून बाहेर येऊन स्वतःला मोकळे करता, तेव्हाच तुम्हाला तुमच्या विशालत्वाची ओळख होते. मी खरं तर हे सगळे समजायला काहीच प्रयत्न केले नव्हते. पण गुरुदेवांनी मला ही शक्ती व जाणीव दिली.

आणखीही एक जाणीव इथे झाली, ती म्हणजे गुरुदेवांसाठी भौगोलिक अंतर नसतेच. काळ आणि अंतर हे आपल्या मनाने मानलेले असते.

---

# रूचि रूचि भोजन

ज्या तिळांत ब्रह्मांड आहे। ऐसा तीळ शोधुनि पाहे।।१।।
तोचि तीळ गुरुसी पुसावा।। आपुला ठाव ओळखावा।।२।।
प्रलय लक्षुनी उपरम। घडी घडी व्हावे सम।।३।।
तीलोदक द्यावे सर्वा। मायाऽविद्या रूपनावा।।४।।
तिळगुळ प्रेमे खावा। पर्वकाळ साधुनी घ्यावा।।५।।
दत्त म्हणे मम प्रीती। भागिरथी तिळावरती ।।६।।

# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार... ✍

## सदाचार

७) उत्तम विज्ञानजले सुस्नात। तेणे होत्साना पूत।
मन आनंदसमुद्रा आत। नित्य क्रीडत मीनापरी।।७।।

**अर्थ** - उत्तम विज्ञानरूपी जलाने जेव्हा आम्ही स्नान करतो, तेव्हा आम्ही खरे पवित्र होतो. मग मात्र आमचे मन आनंद सागरात नेहमीच एखाद्या माशाप्रमाणे क्रीडा करीत असते.

**भावार्थ** - ज्ञान व अज्ञान मावळल्यावर जे रहाते ते म्हणजेच उत्तम विज्ञान! अशा उत्तम विज्ञान जलाने जेव्हा आम्ही स्नान करतो तेव्हा आम्ही पवित्र होतो. येथे स्नान करण्याची क्रियाही वेगळेपणाने न होता समरस होऊनच केली जाते, जसे मीठ पाण्यात विरघळते तसे! ही पवित्रताही वाचेने बोलण्यासारखी नाही. अशाप्रकारे स्नान केल्यावर मन आनंद समुद्रात एखाद्या माशाप्रमाणे नित्य क्रीडा करीत असते. समुद्रामध्ये मासोळी जशी जळावेगळी नसते, तसेच ब्रह्मानंदकल्लोळात मन क्रीडा करीत असते.

८) आता प्राणापान निरोधून। घट जैसा सागरी मग्न।
तेसे पूर्णी स्थापूनि मन। अघमर्षण कीजें।।८।।

**अर्थ** - आता प्राण व अपान यांचा निरोध करून घट जसा सागरात मग्न असतो, तसेच पूर्णी म्हणजेच परब्रह्मी मन स्थिर करून पापांचा क्षय केला पाहिजे.

**भावार्थ** - प्राणायामात पूरक, कुंभक व रेचक अशा तिन्ही क्रिया असतात. पूरक म्हणजे श्वास घेणे, रेचक म्हणजे श्वास सोडणे व कुंभक म्हणजे आत घेतलेला श्वास रोखून धरणे. श्वास घेताना (पूरक) अन्वयाने पाहिले जाते व श्वास सोडताना (रेचक) व्यतिरेकाने पाहिले जाते असा याचा अर्थ आहे. आतमध्ये श्वास रोखून धरणे (कुंभक) म्हणजे स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर राहणे. या प्रक्रियेत कुंभकाचे प्रमाण वाढविले जाते. म्हणजेच जास्तीत-जास्त वेळ स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर राहण्याचा प्रयत्न होतो. सागरातील घट सागरात मग्न आहे असे दिसते. कारण तो

सागरापेक्षा वेगळा नसतोच. अघमर्षणाची क्रिया म्हणजे वेगळेपणा (अभक्त) धुऊन काढणे. अशा स्थितीत साधकावर मायेच्या हल्ल्याचा परिणाम होत नाही. असे अघमर्षण युक्त स्नान जो साधक करतो तो निजांगे ब्रह्म होतो.

९) लयविक्षेपसंधीआंत। मन तेथे विषयरहित।
तो संधि साधिता मुक्त। येथे संशय नाही।।९।।

**अर्थ** - लय आणि विक्षेप याच्या मधली स्थिती असते तेथे मन विषयरहित असते. ती संधी साधली तर साधक मुक्त होतो यात काहीच संशय नाही.

**भावार्थ** - लय म्हणजेच गाढ निद्रा व विक्षेप म्हणजेच चित्ताची चंचलता! या दोन्ही गोष्टी नसताना मधली स्थिती म्हणजेच लयविक्षेप संधी होय! येथे एका गोष्टीचा लय होतो व दुसरी उद्‌भवत नाही अशी स्थिती! जसे सत्वगुणाचा लय होऊन तमोगुणाचा उदय न होणे किंवा एक विषय दृष्टीने सांडणे व दुसऱ्याचा प्रवेश न होणे, अशी उदाहरणे देता येतील. या संधिमध्ये मन विषयरहीत होते म्हणजेच मनाचे कल्पना करणे थांबते. विषय सांडून ते सुखशय्येवर राहते. अशी संधी साधणारा हा मुक्तच होतो यात संशय नाही. येथे संध्याविधी पूर्ण होतो.

१०) सर्व प्राणियांच्या देही। जप चाले सर्वदाही।
सोहं हंसः जाणूनी पाही। सर्व बंधे सोडिजेतो।।१०।।

**अर्थ** - सर्व प्राणीमात्रांच्या देहात सर्वदा जप चालू असतो. तो सोहं हंसः जाणून घेतल्याने सर्वबंध सोडविल्या जातात.

**भावार्थ** - सर्व चर प्राण्यांच्या देही सतत जप चालू असतो. हा जप श्वासोच्छ्वासाच्या योगे चालत असतो. परंतु हा जप जो सोहं हंसः असा असतो तो आपण जाणला पाहिजे. येथे सोहं हंसः याचा अर्थ समजून घ्यायला हवा. सोहं म्हणजे 'तो मी आहे,' जो तीन देह गाळल्यावर उरतो तो 'मी' आहे. तसेच हंसः म्हणजे 'सगळीकडे मीच आहे.' म्हणजेच श्वास व उच्छ्वास या दोन्ही क्रियेत नैसर्गिकरित्या जो जप जपल्या जातो त्याचा अर्थ आपण जाणून घेतला पाहिजे. नुसता जप केल्याने भवसागर आटत नाही. तो जाणल्यानेच सर्वबंध सोडविल्या जातात. तो जाणण्यासाठी इतर जपास लागणारे नियम, वेळ, साधने लागत नाहीत. तर हा जाणणारा सदा मोकळा, ब्रह्म सन्मुखच असतो.

# उत्सव विशेष...

## संक्रांत शिबिर -

**पौष शु. २ ते पौष शु. ४ शके १९३४ दि. १३ जानेवारी ते १५ जानेवारी २०१३**

**मूळपद** (भोगी संक्रांत किंक्रांतपर)

*देह भाव सोडी ब्रह्म भाव जोडी। कल्पना हे मोडी विषयांची।।१।।*
*आहे ते भोगावे। स्वरूप पहावे। वासनेशी द्यावे तिलोदक।।२।।*
*ईश्वराचे सर्व। बोलावे सदैव। कामनेची हाव। नुरवावी।।३।।*
*ऐशी करी क्रांती। तरी हो उन्नती। ईशना पुरती। मग सर्व।।४।।*
*हाची पर्वकाळ। सद्‌गुरु दयाळ। वचने निर्मळ शुद्ध प्राप्ती।।५।।*
*नमुनी त्या दान करावे क्रियमाण। दक्षिणा मी पण। अर्पावी।।६।।*
*संतोष ठेवावा। स्वानंद लुटावा। भजनाचा घ्यावा छंद सदा।।७।।*
*कोण काय कैसे। थोर सान ऐसे। वल्गना कळसे। न उगाळी।।८।।*
*आठवावे प्रिती। गुरु भागिरथी। यातना चुकवी। दत्त म्हणे।।९।।*

## श्रीसस दत्तात्रय महाराज जयंती उत्सव २०१३

**पौष शु. ९ ते पौष कृ. १ शके १९३४ २० जानेवारी ते २९ जानेवारी २०१३**

**मूळपद**

*सद्‌गुरु चरणा मस्तक स्पर्श होता भवभय गेले।*
*स्थूल सूक्ष्म कारण तूर्या। उन्मनीसी बिंदुले।।१।।*
*सद्‌गुरु मुख लोचनी पाहता नवल हो झाले।*
*जिकडे तिकडे सदगुरु ठसा। परब्रम्ह साजरे।।२।।*
*सद्‌गुरु वाणी श्रवणी पडता द्वैत आटले।*
*स्वयंप्रकाश निजस्वरूप। ह्रदयी दाटले।।३।।*
*सद्‌गुरु नयनी सप्रेमे बुडता निरंजन गावले।*
*ह्रदयग्रंथी तुटली संशय मेला। प्रेम डवरले।।४।।*

पान नं. २ वर

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

## संस्थेतील
## प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. ०८मार्च ते १० मार्च २०१३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. २३ मार्च ते १एप्रिल २०१३

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३ दि. १९ मे ते २६ मे २०१३

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |